**ठळक बातम्या**

- राज्यातल्या विविध प्रकल्पांना गती देण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांच्या नवी दिल्लीत गाठीभेटी, प्रधानमंत्री, अर्थमंत्री, वनमंत्र्यांशी चर्चा

- बिहार आणि पश्चिम बंगालमध्ये झालेल्या दुर्घटनांमध्ये १४ भाविकांचा मृत्यू

- भाजपाच्या राष्ट्रीय कार्यकारिणीत राम माधव, स्मृती इराणी, भारती पवार, विनोद तावडे, पीयूष गोयल यांच्यावर विविध जबाबदाऱ्या

**आणि**

- श्रीलंकेविरुद्धच्या कसोटी सामन्यात पहिल्या डावात भारताकडे १७८ धावांची आघाडी

**<><><><><>**

राज्यातल्या विविध प्रकल्पांना गती मिळावी यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी नवी दिल्लीत आज गाठीभेटी घेतल्या. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची भेट घेऊन त्यांनी राज्यातली विविध विकासकामे, प्रलंबित प्रकल्प आणि केंद्र सरकारकडून अपेक्षित सहकार्याबाबत सविस्तर चर्चा केली. महामार्ग, रेल्वे, मेट्रो, नदीजोड प्रकल्प तसेच उत्तन-विरार कॉरिडॉर यांसारख्या प्रकल्पांबाबत यावेळी चर्चा झाली.

**होल्ड मुख्यमंत्री बाइट**

मुख्यमंत्र्यांनी आज केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांचीही भेट घेतली. उत्तन विरार सी लिंक मार्गासाठी जायकामार्फत आर्थिक सहाय्य मिळण्यासाठी केंद्रीय वित्त मंत्रालयाकडून परवानगी मिळावी, अशी विनंती या बैठकीत केल्याचं फडणवीस यांनी भेटीनंतर वार्ताहरांना सांगितलं. सुमारे ५५ हजार कोटींच्या या प्रकल्पासाठी जायकामार्फत वित्तीय सहाय्य मिळविण्याचा प्रस्ताव राज्य सरकारनं सादर केला

आहे. जायकासोबत आणखी एखाद्या बहुपक्षीय वित्तीय संस्थेला सहभागी करून संपूर्ण प्रकल्पासाठी आवश्यक निधी उभारता येईल का, असा पर्याय अर्थमंत्र्यांनी सुचवल्याचं मुख्यमंत्री म्हणाले.

केंद्रीय पर्यावरण मंत्री भूपेंद्र यादव यांच्यासोबतच्या भेटीत विविध पर्यावरण आणि वनविषयक प्रलंबित मंजुरींचा आढावा घेण्यात आला. या मंजुरींमुळे विकास कामांना विलंब होऊ नये, यासाठी त्यांचा जलदगतीने निपटारा करण्याची विनंती मुख्यमंत्र्यांनी केली.

**<><><><><>**

देशातला बेरोजगारीचा दर जुलै महिन्यात ५ पूर्णांक १ दशांश टक्के होता. जूनमध्ये हा दर साडे ५ टक्के होता, अशी माहिती केंद्रीय सांख्यिकी मंत्रालयानं दिली आहे. ग्रामीण भागात हा दर साडे ४ टक्के तर शहरी भागात पावणे ७ टक्के आहे. महिलांमध्ये हे प्रमाण सुमारे साडे ५ टक्के आणि पुरुषांमध्ये ५ टक्के आहे.

**<><><><><>**

बिहारमध्ये लखीसराय जिल्ह्यातल्या अशोक धाम मंदिर मार्गावर आज झालेल्या चेंगराचेंगरीत सात महिलांचा मृत्यू झाला, तर दहापेक्षा जास्त भाविक जखमी झाले. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी या दुर्घटनेबद्दल शोक व्यक्त केला आहे.

मुख्यमंत्री सम्राट चौधरी यांना दुर्घटनेबद्दल तीव्र शोक व्यक्त केला असून मृतांच्या कुटुंबांना प्रत्येकी चार लाख रुपयांची मदत जाहीर केली आहे.

**<><><><><>**

पश्चिम बंगालमध्ये बीरभूम जिल्ह्यात आज एका हॉटेलला लागलेल्या आगीत सात जणांचा मृत्यू झाला तर अनेक जण गंभीर जखमी झाले. श्रावणी सोमवारच्या निमित्तानं इथल्या तारापीठ मंदिरात आलेले अनेक भाविक या हॉटेलमध्ये मुक्कामाला उतरले होते.

**<><><><>**

देशभरातल्या दिव्यांग व्यक्तींनाही आस्वाद घेता येईल अशारितीने चित्रपटांची निर्मिती करण्याचं आवाहन आज दिल्ली उच्च न्यायालयानं आज केंद्र सरकार, केंद्रीय चित्रपट प्रमाणन मंडळ तसंच चित्रपट निर्मात्यांना केलं. याबाबत जे काही करता येईल त्याबाबत येत्या दोन आठवड्यात निर्णय घ्यावा असे निर्देश दिल्ली उच्च न्यायालयानं एका याचिकेची सुनावणी करताना दिले.

**<><><><>**

अयोध्येतल्या राम मंदिर देणगी अपहार प्रकरणी विशेष तपास पथकाने चौकशी जलद पूर्ण करून तार्किक निष्कर्षापर्यंत पोहोचण्याचे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने आज दिले. या प्रकरणातल्या तपासाच्या प्रगतीबाबतचा अहवाल बंद लखोट्यात सादर करावा असे निर्देशही सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्यकांत, न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची आणि व्ही. मोहना यांच्या पीठाने दिले आहेत. हा अहवाल सर्वप्रथम आपण पाहू, त्यानंतर तो सर्व पक्षकारांना उपलब्ध करून द्यायचा किंवा नाही, याचा निर्णय घेण्यात येईल, असंही न्यायालयाने यावेळी स्पष्ट केलं. तपासाचा दर्जा सुधारण्यासाठी आणि त्यात पारदर्शकता आणण्यासाठी विविध याचिकाकर्त्यांनी केलेल्या सूचनांचा वस्तुनिष्ठपणे विचार करावा, अशा सूचनाही यावेळी न्यायालयाने विशेष तपास पथकाला दिल्या आहेत.

**<><><><>**

कर्नाटक राज्य सरकारने कावेरी पाणी व्यवस्थापन प्राधिकरणाच्या निर्देशांचं पालन करावं असं सर्वोच्च न्यायालयाने सांगितलं आहे. तमिळनाडूकरता १२ हजार क्युसेक्स पाणी सोडण्याचे निर्देश प्राधिकरणाने कर्नाटकला दिले आहेत, मात्र त्याचं पालन झालं नसल्याचा आरोप तमिळनाडूने दाखल केलेल्या याचिकेत केला आहे.

<><><><><>

राज्यात SIR अर्थात मतदार यादी विशेष पुनरीक्षण प्रक्रियेत अर्ज जमा करण्याचा आज शेवटचा होता. प्रारुप मतदार यादी २४ ऑगस्टला प्रकाशित होणार असून त्यावर २३ सप्टेंबरपर्यंत आक्षेप नोंदवता येतील. २२ ऑक्टोबरपर्यंत हे आक्षेप निकाली काढले जातील आणि २७ ऑक्टोबरला अंतिम मतदार यादी प्रसिद्ध होईल.

निवडणूक आयोगानं दिलेल्या माहितीनुसार राज्यात आज सकाळपर्यंत २ कोटी ७ लाख ९३ हजार ९१६ मतदारांचे अर्ज BLO ला मिळालेले नव्हते. राज्यात एकूण ९ कोटी ७८ लाख ५४ हजार ४९ मतदार आहेत. त्यांच्या तुलनेत अर्ज जमा न केलेल्या मतदारांची संख्या २१ टक्क्यांपेक्षा जास्त आहे. नागपूर, ठाणे, पुणे, नाशिक, रायगड, मुंबई शहर आणि उपनगर, पालघर या जिल्ह्यांमध्ये अर्ज जमा न केलेल्या मतदारांची संख्या सर्वाधिक आहे. तर १ लाख ७ हजार ८७१ मतदारांचा ठावठिकाणा लागत नसल्यानं त्यांना अर्ज वाटप झालेलं नाही.

<><><><><>

भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नवीन यांनी पक्षाच्या राष्ट्रीय कार्यकारिणीची घोषणा केली आहे. या नव्या टीममध्ये १३ राष्ट्रीय उपाध्यक्ष, आठ राष्ट्रीय सरचिटणीस आणि पक्षाच्या विविध आघाड्यांच्या नवीन अध्यक्षांचा समावेश आहे. विनोद तावडे यांची भाजपच्या राष्ट्रीय सरचिटणीसपदी, माजी केंद्रीय मंत्री डॉ. भारती प्रवीण पवार यांची राष्ट्रीय उपाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. केंद्रीय मंत्री पीयूष गोयल यांच्याकडे पक्षाच्या राष्ट्रीय कोषाध्यक्षपदाची जबाबदारी सोपवण्यात आली आहे.

याशिवाय वसुंधरा राजे सिंधिया, राम माधव यांच्यासह १३ नेते राष्ट्रीय उपाध्यक्ष आहेत. बी एल संतोष संघटन सरचिटणीस म्हणून कायम आहेत. सह-संघटन सरचिटणीसपदी शिवप्रकाश आणि सौदान सिंह कार्यरत राहतील. स्मृती

इराणी, विप्लब कुमार देब यांची राष्ट्रीय सरचिटणीस म्हणून नेमणूक झाली आहे. अनिल बलूनी यांची मीडिया संयोजकपदी, दीपक म्हस्के यांची सोशल मीडिया संयोजकपदी तर प्रीति गांधी यांची सोशल मीडिया सह-संयोजकपदी निवड झाली आहे.

विविध मोर्चांच्या अध्यक्षपदी युवा मोर्चा अध्यक्ष पदी डॉ. हेमांग जोशी, तर महिला मोर्चा अध्यक्षपदाची जबाबदारी रूपकुमारी चौधरी यांना देण्यात आली आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी नवनिर्वाचित राष्ट्रीय पदाधिकाऱ्यांना आणि विविध जबाबदाऱ्या सोपवण्यात आलेल्या नेत्यांना शुभेच्छा दिल्या आहेत.

**<><><><><>**

भारत-श्रीलंका कसोटी क्रिकेट मालिकेत गॉल इथं सुरू असलेल्या पहिल्या सामन्यात आज तिसऱ्या दिवसअखेर भारताला पहिल्या डावात १७८ धावांची आघाडी मिळाली. आज भारताचा पहिला डाव ४६२ धावांवर संपला. त्यानंतर फलंदाजीसाठी आलेल्या श्रीलंकेची सुरुवात खराब झाली. त्यांचे आघाडीचे ५ फलंदाज ९० धावात बाद झाले. मात्र, त्यानंतर सोनल दिनुशा आणि निरोशन डिक्वेल्ला यांनी डाव सावरला. त्यांनी सहाव्या गड्यासाठी १४७ धावांची भागिदारी केली. सोनल दिनुशानं १००, तर निरोशननं ८० धावा केल्या. इतर फलंदाजांना चांगली कामगिरी करता आली नाही. त्यामुळे श्रीलंकेचा पहिला डाव २८४ धावांवर संपला. त्यानंतर पाऊस सुरु झाल्यामुळे भारताचा दुसरा डाव सुरु होऊ शकला नाही.

**<><><><><>**

नवी दिल्ली इथं सुरू असलेल्या बीडब्ल्यूएफ जागतिक बॅडमिंटन स्पर्धेत भारताच्या पी. व्ही. सिंधूनं महिला एकेरीच्या दुसऱ्या फेरीत धडक मारली आहे. तिनं आज आयर्लंडच्या सोफिया नोबलचा २१-७, २१-११ असा सहज पराभव केला.

महिला दुहेरीतही भारताच्या ट्रीसा जॉली आणि गायत्री गोपीचंद यांनी दुसऱ्या फेरीत प्रवेश केला आहे. या भारतीय जोडीनं स्पेनच्या पॉला लोपेझ आणि लुसिया रॉड्रिग्ज यांचा २१-९, २१-१३ असा पराभव केला. त्याआधी, पुरुष दुहेरीत एम. आर. अर्जुन आणि हरिहरन अमसाकरुणन या जोडीनं दुसऱ्या फेरीत धडक मारली. दुसऱ्या गेममध्ये ही जोडी ६-४ अशी आघाडीवर असतानाच, त्यांचे प्रतिस्पर्धी आयर्लंडचे स्कॉट गिल्डिया आणि पॉल रेनॉल्ड्स यांना दुखापतीमुळे सामना अर्धवट सोडावा लागला. अर्जुन आणि अमसाकरुणन यांनी पहिला गेम २१-१६ असा जिंकला होता.

//<><><><><>//